POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-२८८ ● मुंबई, गुरुवार, २१ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

पुण्यात 'मोटेगावकर' आरसीसी क्लासवर महापालिकेची मोठी कारवाई

३.२० कोटींचा कर थकीत, क्लास सील

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात चर्चेत आलेले प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांच्या पुण्यातील प्रसिद्ध ह्यआरसीसी पॅटर्न कोचिंग क्लासह्णवर पुणे महापालिकेने मोठी कारवाई केली आहे. जंगली महाराज रोडवरील क्लासला बेकायदेशीर वापर आणि तब्बल ३ कोटी २० लाख रुपयांचा मिळकत कर थकीत असल्याच्या कारणावरून महापालिकेने सील ठोकले आहे.



पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभाग झोन क्रमांक ६ च्या पथकाने ही कारवाई केली. डेक्कन परिसरातील 'बोरावके टॉवर्स'मधील 'नालंदा कॅम्पस'च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या क्लासेसवर प्रशासनाने टाळे ठोकत परिसर सील केला.

महापालिकेच्या माहितीनुसार, संबंधित जागेचा वापर आवश्यक परवानगीशिवाय व्यावसायिक कारणांसाठी केला जात होता. जागेचे मालक आणि आरसीसी मोटेगावकर क्लासेस यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६८ (१)(ओ) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली आहे.

महापालिकेने दिलेल्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे की, शिवाजीनगर येथील सि. स. नं. १२५६/२अ, फा. प्लॉट नं. ६२१/२अ मधील निवासी स्वरूपाच्या जागेत कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अंतर्गत फेरबदल करण्यात आले होते. त्यानंतर त्या जागेचा वापर कोचिंग क्लाससाठी व्यावसायिक पद्धतीने सुरू करण्यात आला होता.

तपासादरम्यान पहिल्या मजल्यावरील शॉप क्रमांक ९ तसेच दुसरा आणि तिसरा मजला येथे विनापरवाना क्लासेस सुरू असल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय या इमारतीवर तब्बल ३ कोटी २० लाख रुपयांचा मिळकत कर थकीत असल्याचेही महापालिकेने सांगितले आहे.

कारवाईदरम्यान प्रशासनाने क्लासच्या मुख्य दरवाजावर नोटीस चिकटवत दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील सर्व साहित्य हटवण्याचे आदेश दिले. बाकडी, कपाटे, फ्लेक्स आणि इतर शैक्षणिक साहित्य एका महिन्याच्या आत काढून जागा रिकामी करण्याची मुदत देण्यात आली आहे.

महापालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, दिलेल्या मुदतीत जागा रिकामी न केल्यास पोलिसांच्या मदतीने पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच या कारवाईचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल केला जाईल.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणात अटक झालेल्या प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांच्या नावामुळे हा क्लास आधीच चर्चेत होता. आता महापालिकेच्या या कारवाईमुळे पुण्यातील शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पेपरफुटी प्रकरणाचे विदर्भात पडसाद
अमरावतीही सीबीआयच्या रडारवर?



देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास आता थेट विदर्भापर्यंत जाऊन पोहोचला आहे. केंद्रीय अन्वेषण ब्युरो म्हणजेच सीबीआयने या प्रकरणाची महाराष्ट्रातील तपासाची व्याप्ती वाढविली आहे. नांदेड, लातूर, नाशिक आणि पुणे येथील कारवाईनंतर आता थेट नागपूर आणि चंद्रपूर येथे छापे टाकण्यात आल्याने अमरावतीतही खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीसह विदर्भातील काही शहरांवर तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रीत झाले असून, येत्या काही दिवसांत मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंगळवारी (९९ मे) सकाळी सीबीआयच्या पथकाने नागपूरच्या गणेशपेठ आणि कोतवाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत राहणाऱ्या दोन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकले. विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची चौकशी करण्यात आली. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या घरीही तपास करण्यात आला. प्राथमिक तपासात हे तिन्ही विद्यार्थी लातूरमधील प्रसिद्ध कोचिंग संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या संस्थेशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडींनंतर राज्यभरातील प्रवेश एजन्सी, कोचिंग क्लासेस आणि संशयित दलालांच्या हालचालींवर तपास यंत्रणांनी बारीक लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. विदर्भातील शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख असलेल्या अमरावतीत मोठ्या प्रमाणावर नीट आणि स्पर्धा परीक्षांच्या कोचिंग संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित कोणते धागेदोरे येथेही सापडतात का, याची पडताळणी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधी काही कोचिंग संस्थांकडे प्रश्नपत्रिका पोहोचल्याचा संशय आहे. या प्रकरणात आतापर्यंत सीबीआयने पाच राज्यांत छापे टाकून १० आरोपींना अटक केली आहे. कोचिंग ऑपरेटर, प्रवेश एजन्सी आणि प्रश्नपत्रिका खरेदी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नेटवर्कचा शोध घेण्यासाठी दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, पुणे, नाशिक, लातूर आणि अहिल्यानगरसह विविध शहरांत तपास मोहीम सुरु आहे. अमरावतीतील कोचिंग संस्थांमध्ये सध्या अस्वस्थतेचे वातावरण असून, तपासाच्या हालचालींमुळे शैक्षणिक क्षेत्रात चर्चांना उधाण आले आहे.

मतदार यादी अचूक करण्यासाठी प्रशासन सज्ज
ठाणे जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ
विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा



■ठाणे। प्रतिनिधी,

भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार ठाणे जिल्ह्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी जिल्ह्यातील सद्यस्थितीतील मतदार संख्या, मतदान केंद्रांची रचना आणि आगामी पुनरीक्षण कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी माहिती देताना सांगितले की, सध्या ठाणे जिल्ह्यात एकूण मतदार संख्या ७४ लाख ७२ हजार २७० इतकी आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३९ लाख ५६ हजार ५८६ तर महिला मतदारांची संख्या ३५ लाख १४ हजार २१८ एवढी आहे. याशिवाय जिल्ह्यात १ हजार ४६६ इतर मतदार, १ हजार १६ अनिवासी भारतीय (टफक्क) मतदार, २ लाख ५ हजार ३२९ तरुण मतदार (वय १८-१९), ४० हजार ८२ दिव्यांग मतदार आणि ५२ हजार २२० ज्येष्ठ नागरिक (वय ८५ वर्षांपेक्षा जास्त) मतदारांची नोंद आहे. जिल्ह्याचा सरासरी जेंडर रेशिओ ८८८ इतका असून, १४६-ओवळा माजिवडा हा ५ लाख ७२ हजार ९५८ मतदारांसह जिल्ह्यातील सर्वाधिक मतदार असलेला मतदारसंघ ठरला आहे, तर सर्वात कमी मतदार १४१-उल्हासनगर मतदारसंघात असून तेथे २ लाख ९४ हजार ३१४ मतदार आहेत.

मतदान केंद्रांच्या रचनेबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्यात सद्यस्थितीत एकूण ६ हजार ८९४ मूळ मतदान केंद्र आहेत. मतदारांच्या सोयीसाठी ही केंद्र वेगवेगळ्या ठिकाणी नियोजित करण्यात आली असून, यामध्ये २ हजार २६७ पदनिर्देशित ठिकाणी ६ हजार ८९४ मूळ मतदान केंद्रांची व्यवस्था असेल. या रचनेत पक्क्या इमारतीमधील मतदान केंद्रांची संख्या ४ हजार ६७० असून, १ हजार २३१ केंद्र पार्टिशनमध्ये, ४०४ केंद्र मंडपामध्ये, ३३७ केंद्र सोसायट्यांमध्ये आणि २५२ केंद्र झोपडपट्टी बहुल भागात म्हणजेच स्लम क्लस्टरमध्ये उभारली जाणार आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक ५१८ मतदान केंद्र १३९-मुरबाड मतदारसंघात असून, सर्वात कमी २६० मतदान केंद्र १४१-उल्हासनगर मतदारसंघात आहेत.

आगामी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकाची माहिती देताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले की, या कार्यक्रमासाठी १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. या मोहिमेची पूर्वतयारी, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि आवश्यक छपाईचे काम २० जून ते २९ जून २०२६ या कालावधीत पूर्ण केले जाईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या काळात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रत्यक्ष भेटी देणार आहेत. या घरभेटी दरम्यान प्रत्येक मतदाराला 'एन्यूमरेशन फॉर्म'च्या दोन प्रती दिल्या जातील, ज्यातील एक प्रत मतदाराची किंवा कुटुंबप्रमुखाची स्वाक्षरी घेऊन बीएलओमार्फत संकलित केली जाईल आणि दुसरी प्रत पोचपावती म्हणून मतदाराला दिली जाईल.

प्रशासकीय प्रक्रियेनुसार २९ जुलै २०२६ पर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण केले जाईल आणि ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. नागरिकांना आपल्या दावे व हरकती ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दाखल करता येतील, तर या सर्व दावे-हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण केली जाईल. सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी ठाणे जिल्ह्याची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. ज्या मतदारांची माहिती पूर्वीच्या डेटाबेसशी किंवा सन २००२ च्या मतदार यादीशी जुळणार नाही, त्यांना मतदार नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत सुनावणीची नोटीस दिली जाईल आणि अशा मतदारांना त्यांच्या जन्माच्या वर्षाच्या वर्गवारीनुसार (उदा. १ जुलै १९८७ पूर्वी, किंवा त्यानंतरचे कालखंड) आवश्यक असणारे अधिकृत दस्तऐवज जसे की जन्म दाखला, पासपोर्ट, शैक्षणिक प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा जात प्रमाणपत्र सादर करावे लागेल. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आणि पात्र मतदारांनी या प्रक्रियेत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

ठाणे विधानपरिषद निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज
जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे आचारसंहिता पालनाचे आवाहन

■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक 2026 चा बिगुल वाजला असून, या निवडणुकीच्या यशस्वी आणि पारदर्शक संचालनासाठी ठाणे जिल्हा प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे, अशी माहिती ठाणे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज दिली. निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांची एक अत्यंत महत्त्वाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात पार पडली. या बैठकीत त्यांनी सर्व राजकीय पक्षांना निवडणूक आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, राज्यातील 16 स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांमध्ये ठाणे मतदारसंघाचा समावेश आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ हे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून स्वतः लक्ष ठेवून असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

राजकीय पक्षांच्या बैठकीत माहिती देताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी निवडणुकीच्या कायदेशीर टप्प्यांची आणि अधिकृत वेळापत्रकाची सविस्तर घोषणा केली. त्यानुसार 25 मे 2026 रोजी या निवडणुकीची रीतसर अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार असून, त्यानंतर खऱ्या अर्थाने निवडणूक प्रक्रियेला गती येईल. इच्छुक उमेदवारांना 01 जून 2026 पर्यंत आपले नामनिर्देशन पत्र म्हणजेच उमेदवारी अर्ज सादर करता येतील.

दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी 02 जून 2026 रोजी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी 04 जून 2026 ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. यानंतर 18 जून 2026 रोजी सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार असून 22 जून 2026 रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार 25 जून 2026 पर्यंत ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

मतदारसंघाच्या भौगोलिक आणि राजकीय रचनेबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सांगितले की, ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील एकूण 20 स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश होतो. या निवडणुकीत दोन्ही जिल्ह्यांतील एकूण 1064 मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असून, यामध्ये विविध महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे थेट निवडलेले नगराध्यक्ष, निवडून आलेले लोकप्रतिनिधी तसेच स्वीकृत नगरसेवकांचा समावेश आहे. मतदारांच्या सोयीसाठी संपूर्ण मतदारसंघात एकूण 18 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. प्रशासकीय पातळीवर सर्व प्रकारची तयारी पूर्ण झाली असून, ही निवडणूक निर्भय, न्याय्य आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांच्या या बैठकीला ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील विविध राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकारी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

कल्याणमध्ये 2 अल्पवयीन मुलींना दिवस गेले
कुटुंबियांच्या पायाखालची जमीन सरकली, काय घडलं?

■डोंबिवली। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवली परिसरातील महिला व बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कल्याण रेल्वे स्थानकातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरण ताजे असतानाच डोंबिवलीत दोन वेगवेगळ्या भागात अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे दोन्ही पीडित मुली गर्भवती राहिल्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मानपाडा आणि रामनगर पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.



दोन अल्पवयीन मुलींना अत्याचारातून दिवस गेले

पहिल्या घटनेत मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका 16 वर्षीय अल्पवयीन मुलीवर त्यांच्या ओळखीच्या तरुणाकडून लैंगिक अत्याचार करण्यात आला. अत्याचारानंतर आरोपी काजू निषाद (23) हा उत्तर प्रदेशात पळून गेला होता. पीडित मुलगी गर्भवती राहिल्यानंतर तिच्या कुटुंबीयांना हा प्रकार समजला. त्यांनी तातडीने पोलिसांत धाव घेऊन आठवडाभरापूर्वी गुन्हा दाखल केला. मानपाडा पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढत त्याला उत्तर प्रदेशातून अटक करून रात्री डोंबिवलीत आणले आहे. आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात असून अधिक तपास सुरू आहे.

दुसरी घटना रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला जाळ्यात ओढून शुभम सरोज याने तिच्यावर वारंवार अत्याचार केला. तिचे वय सोळा वर्ष सांगितले जात आहे. शुभम हा खाजगी व्हिडिओग्राफीचे काम करतो. या प्रकरणातही पिडीत मुलगी गर्भवती राहिल्यावर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी शनिवारी संध्याकाळी रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच शुभम सरोज (24) याला अटक करण्यात आली.

या दोन्ही घटनांपूर्वी अहिल्यानगर येथून खोपोलीला मामाकडे जाण्यासाठी निघालेल्या एका 14 वर्षीय मुलीवर सौरभ सोनवणे याने अत्याचार केल्याची घटना घडली होती. गेल्या चोवीस तासांत कल्याण आणि डोंबिवलीत तीन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याचे समोर आल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. कल्याण उपविभागातील पोलिस या तिन्ही प्रकरणांचा कसून तपास करत आहेत. आरोपींच्या विरोधात कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

रत्नागिरी हादरलं! महिलेच्या हातात गावठी बॉम्बचा स्फोट... २० ते २५ जिवंत बॉम्बही सापडले

■रत्नागिरी। प्रतिनिधी,

रत्नागिरी तालुक्यातील जांभारी फाटा परिसर मंगळवारी सकाळी भीषण स्फोटाने हादरला. वाटद पोलीस चौकी हद्दीत लाकडे गोळा करण्यासाठी गेलेल्या एका महिलेच्या हातात गावठी बॉम्बचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली. या स्फोटात महिलेच्या हाताच्या पंजाची गंभीर अवस्था झाली असून बोटे, नखं तुटल्याने त्वचा होरपळली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४५ वर्षीय रेश्मा प्रमोद सुर्वे या मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास जंगल परिसरात लाकडे आणण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांना झाडाझुडपांमध्ये एक संशयास्पद वस्तू दिसली. ती वस्तू नेमकी काय आहे हे पाहण्यासाठी त्यांनी ती हातात उचलताच अचानक जोरदार स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की परिसरात एकच धावपळ उडाली.

या भीषण स्फोटात रेश्मा सुर्वे यांच्या डाव्या हाताचा पंजा गंभीर जखमी झाला. हाताची बोटे तुटली असून नखं उडाल्याने त्वचा पूर्णपणे भाजली गेली आहे. स्फोटामुळे त्या रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळल्या. स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत त्यांना उपचारासाठी रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबई येथे हलवण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच जयगड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. पोलिसांना तपासादरम्यान घटनास्थळाजवळ तब्बल २० ते २५ जिवंत गावठी बॉम्ब आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्फोटके जंगल परिसरात कोणी ठेवली? त्यामागचा उद्देश काय होता? याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



पोलिसांनी तातडीने संपूर्ण परिसर सील केला असून बॉम्ब शोध पथकाला पाचारण करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून प्रत्येक कोनातून तपास सुरू करण्यात आला आहे. या स्फोटकांचा वापर नेमका कोणत्या कारणासाठी केला जाणार होता, याचा शोध पोलीस घेत आहेत. या धक्कादायक घटनेमुळे जांभारी फाटा परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, रत्नागिरी जिल्ह्यात आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राजापूर शहराजवळील कोदवली साईनगर पुनर्वसन वसाहतीतील फुडलैंड हॉटेलमधून ग्राहक नोंदणी रजिस्टर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. चार अज्ञात तरुणांनी रूम पाहण्याच्या बहाण्याने हॉटेलमध्ये प्रवेश करून हे रजिस्टर लंपास केल्याने शहरात एकच चर्चा रंगली आहे.

माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास दोन तरुण फुडलैंड हॉटेलमध्ये आले. त्यांनी हॉटेल कर्मचाऱ्यांकडे रूम उपलब्ध आहे का, अशी चौकशी केली. कर्मचाऱ्याने रूम उपलब्ध असल्याचे सांगताच त्यांनी रूम दाखवण्याची मागणी केली. त्यानंतर एक तरुण कर्मचाऱ्यासोबत पहिल्या मजल्यावर रूम पाहण्यासाठी गेला, तर त्याचा दुसरा साथीदार खालीच थांबला होता. दरम्यान, आणखी दोन तरुण हॉटेलबाहेर घुटमळताना दिसत होते.

काही वेळाने रूम पाहून आलेल्या तरुणाने रूम नको असल्याचे सांगितले आणि चौघेही तेथून निघून गेले. मात्र त्यानंतर हॉटेल कर्मचाऱ्याच्या लक्षात आले की, काऊंटरवर ठेवलेले ग्राहक नोंदणी रजिस्टर गायब झाले आहे. संशय आल्याने सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, खाली थांबलेल्या एका संशयिताने रजिस्टर उचलून आपल्या बॅगेत टाकल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच हॉटेल मालक आणि राजापूर नगर परिषदेचे आरोग्य सभापती सुलतान ठाकूर यांनी तातडीने हॉटेलमध्ये धाव घेतली. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून राजापूर पोलिसांत तक्रार दाखल केली. संशयित तरुण मराठी भाषेत बोलत असल्याचेही समोर आले आहे. हॉटेलमधून बाहेर पडल्यानंतर ते महामार्गावरील पेट्रोल पंपाच्या दिशेने जात असल्याचे फुटेजमध्ये दिसत आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत राजापूरचे पोलिस निरीक्षक अमित यादव यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. पोलिसांनी संबंधित सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर प्रसारित करत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. ग्राहक नोंदणी रजिस्टर चोरीमागे नेमका काय हेतू होता, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू करण्यात आला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

लोकसंख्येच्या वाढीसाठी पैसे !



भारत लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर आहे, तरीही आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राज्यातील जनतेला 'हम दो हमारे दो' विसरून अधिक मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे. यासाठी त्यांनी 'तिसऱ्या अपत्यासाठी ३० सहस्र आणि चौथ्यासाठी ४० सहस्र रुपये लगेच देण्यात येतील', असे म्हटले आहे. यापूर्वी नायडू यांनी दुसऱ्या अपत्यासाठी २५ सहस्र रुपये देण्याचा प्रस्ताव मांडला होता, तसेच तिसऱ्या अपत्याला १८ वर्षापर्यंत विनामूल्य शिक्षण देण्याचा विचारही धोरणाच्या प्रारूपात करण्यात आला होता. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पालकांना 'तल्ली की वंदनम्' योजनेअंतर्गत आधीच १५ सहस्र रुपये दिले जात आहेत, ज्यामध्ये वाढ करण्याचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अचानक झालेल्या आताच्या घोषणेमुळे भारतीय चकीत झाले आहेत. एकीकडे भारताच्या लोकसंख्येवर नियंत्रण मिळवणे आवश्यक असतांना अशा प्रकारची विरोधाभासी घोषणा का करावी लागली आहे? हा प्रत्येकाच्या मनात प्रश्न उपस्थित होतो. ही घोषणा वर वर विसंगत वाटली, तरी त्यामागे दडलेले लोकसंख्याशास्त्रीय संकट आणि भविष्यातील हिंदूंच्या अस्तित्वाचे धोके अत्यंत भीषण आहेत. उत्तर भारतात लोकसंख्येचा स्फोट आहे, तर दक्षिण भारतात तरुण रक्ताचा दुष्काळ पडण्याची चिन्हे आहेत. हा प्रादेशिक असमतोल देशाच्या अखंडतेसाठी धोकादायक ठरू शकतो. जपान आणि युरोपातील देश आज मनुष्यबळासाठी तळमळत आहेत; तीच वेळ दक्षिण भारतातील हिंदूंवर येऊ नये, ही दूरदृष्टी नायडूंच्या निर्णयात दिसते, असे सांगितले जात आहे. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये, विशेषतः आंध्रप्रदेश आणि तमिळनाडू यांमध्ये गेल्या ३ दशकांपासून 'कुटुंब नियोजना'चे ओझे प्रामुख्याने सुशिक्षित हिंदु समाजानेच उचलले. याचा परिणाम असा झाला की, या राज्यांच्या 'प्रजननाचे प्रमाण' २.१ या आवश्यक पातळीपेक्षाही खाली (१.७ ते १.९) घसरले आहे. हिंदूंनी 'हम दो हमारा एक' हे धोरण स्वीकारल्यामुळे तरुण हिंदूंची संख्या न्यून होत असून वृद्ध हिंदूंची संख्या वेगाने वाढत आहे. जर हीच स्थिती राहिली, तर पुढील २० वर्षांत या राज्यांत काम करणाऱ्या हिंदु तरुणांची कमतरता भासेल आणि 'वृद्धांचा समाज' अशी हिंदूंची ओळख होईल. हे टाळण्यासाठी नायडू प्रयत्न करत आहेत. वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आंध्रप्रदेशात ८८.४६ टक्के हिंदु, ९.५६ टक्के मुसलमान आणि १.३४ टक्के खिस्ती नोंदवले गेले होते; मात्र हे चित्र अत्यंत फसवे आहे. आंध्रमध्ये 'अधिकृत' खिस्ती संख्या १.३४ टक्के दिसत असली, तरी वास्तवात ती १० ते १५ टक्क्यांच्या पुढे गेल्याचे अनेक सामाजिक अभ्यासक सांगतात. अनेक धर्मांतरित खिस्ती केवळ आरक्षणाच्या लाभासाठी सरकारी कागदपत्रांवर स्वतःची 'हिंदु' अशीच नोंद ठेवतात. यामुळे हिंदूंची संख्या कागदावर मोठी दिसत असली, तरी आचरणाने आणि निष्ठेने हिंदु असलेला समाज घटत चालला आहे. त्याच वेळी मुसलमानांचे प्रजननाचे प्रमाण हिंदूंपेक्षा नेहमीच अधिक राहिले आहे. केरळम्सारख्या राज्यात तर हिंदूंची लोकसंख्या ५४.७ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. हीच लाट आता आंध्र आणि तेलंगणा या राज्यांकडे सरकत आहे. जेव्हा एखाद्या विशिष्ट वर्गाची लोकसंख्या घटते, तेव्हा त्याचा परिणाम राजकीय स्थितीवरही होतो. भविष्यात लोकसभेच्या जागांची पुनर्रचना होणार आहे. ज्या राज्यांची लोकसंख्या न्यून होईल, त्यांच्या संसदेतील जागा न्यून होतील. याचा अर्थ दक्षिण भारताचा देशाच्या राजकारणातील प्रभाव न्यून होईल. त्यातही हिंदूंची संख्या अंतर्गतरित्या घटल्यामुळे हिंदूंच्या हिताचे रक्षण करणारे नेतृत्व निवडून येणे कठीण होईल. म्हणूनच कुटुंबांना तिसऱ्या अपत्यासाठी पैसे देऊन शासन त्यांना एकप्रकारे 'संख्यात्मक युद्धा'त उतरण्याचे आवाहन करत आहे. आंध्र आणि तमिळनाडू येथे खिस्ती मिशनऱ्यांचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालते. आर्थिक प्रलोभने किंवा आरोग्याच्या सुविधा यांच्या नावाखाली होणाऱ्या धर्मांतरामुळे हिंदु समाज आतून पोखरला जात आहे. कागदावर 'हिंदु'; पण आचरणाने 'खिस्ती' अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे हिंदूंची संघटित राजकीय शक्ती क्षीण होत आहे. चंद्राबाबू नायडू यांची घोषणा याच 'असंतुलना'कडे निर्देश करते. जर हिंदू समाज संख्यात्मक दृष्टीने मागे पडला, तर लोकशाहीत 'डोकी मोजली जातात', या न्यायाने हिंदूंचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व न्यून होऊ शकते; म्हणूनच लोकसंख्या वाढवण्याचे आवाहन हे केवळ आकड्यांसाठी नसून ते 'सामाजिक अस्तित्व' टिकवण्यासाठी असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात आहे. येथे कळीचा प्रश्न हा आहे की, या आर्थिक प्रोत्साहनाचा लाभ नेमका कुणाला होणार? धार्मिक संस्कार आणि नियम यांच्या पालनामुळे हिंदूंची लोकसंख्यावाढ खुंटली आहे. जर हिंदु समाजाने या योजनेचा लाभ घेऊन संख्या वाढवली नाही, तर हा पैसा पर्यायाने इतर समुदायांकडेच जाईल. खिस्ती मिशनऱ्यांकडून आधीच आर्थिक साहाय्य मिळवणाऱ्या धर्मांतरित गटांना आता सरकारी साहाय्यही मिळाले, तर त्यांची संख्या वेगाने वाढेल. जर केवळ अल्पसंख्यांक समुदायानेच मुले वाढवली, तर हिंदूंचा टक्का अधिक वेगाने घसरेल आणि नायडूंचा हा निर्णय हिंदूंसाठी 'भस्मासुर' ठरू शकतो.केवळ पैसे देऊन प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत 'समान नागरी कायदा' आणि 'लोकसंख्या नियंत्रण कायदा' होत नाही, तसेच धर्मांतरावर कडक बंदी घातली जात नाही, तोपर्यंत अशा योजनांचा अपलाभ राष्ट्रविघातक शक्ती किंवा धर्मांतरित गट घेण्याची शक्यता अधिक असते. 'हे कायदे का केले जात नाहीत?', असा प्रश्न हिंदूंनी सरकारांना विचारणे आवश्यक झाले आहे. हिंदूंच्या संघटनाही याविषयी काहीच बोलतांना दिसत नाहीत. यातून अन्य धर्मियांपेक्षा हिंदूच हिंदूंचे खरे वैरी आहेत, असे म्हटले, तर चुकीचे ठरत नाही. सध्या देशात जनगणना चालू झाली आहे, याची आकडेवारी १-२ वर्षांत समोर येईल. तेव्हा देशाची खरी लोकसंख्या काय आहे आणि कोण कुठे आहे, हे समोर येईल. त्यानंतर तरी सरकार जागे होऊन काहीतरी करील, अशी अपेक्षा ठेवावी लागेल. दुसरीकडे हिंदु समाजाने आता जागृत होऊन केवळ 'एक अपत्य' या पाश्चात्त्य मानसिकतेतून बाहेर पडणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढवतांना ती सुसंस्कृत, धर्मनिष्ठ आणि राष्ट्रप्रेमी असेल, तरच ती देशाचे सामर्थ्य ठरेल, अन्यथा केवळ आकड्यांची वाढ ही हिंदूंच्या विनाशाला आमंत्रण ठरू शकते!

स्वयंनियमनाचे आवाहन आणि पोटशूळ



सामान्य माणूसही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो असा आजवरचा अनुभव आहे. यावेळीही सामान्य माणूस इंधन बचतीचे आणि सोने खरेदीवर नियंत्रण आणण्याचे आवाहन प्रत्यक्षात आणेल, यात शंका नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आणि सोने खरेदी वर्षभर थांबवण्याचे केलेले आवाहन विरोधी पक्षांना नेहमीप्रमाणे पचले नाही. पश्चिम बंगाल आणि आसाममधील दणदणीत पराभवामुळे पंतप्रधान मोदी आणि भारतीय जनता पक्ष विरोधातील मळमळ बाहेर काढण्याची विरोधकांची संधी हुकली होती. इंधन बचतीच्या आवाहनानंतर युवराज राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीचा संदर्भ घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध गरळ ओकली. असे करून या मंडळींना समाधान वाटत असल्याने कोणाला त्याबाबत आक्षेप घेण्याचे कारण नाही. सततच्या पराभवामुळे आणि विजयाची शक्यता दृष्टिपथात नसल्यामुळे मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाविरुद्ध गैरसमज निर्माण करण्यासाठी खोटी माहिती पसरवण्याचे उद्योग काँग्रेस आणि अरविंद केजरीवाल यांच्यासारखे अन्य विरोधक सातत्याने करीत असतात. देशातील जनतेला भ्रमित करण्याच्या कुटील हेतूने हे राजकारण खेळले जाते. मात्र जनतेला गांधी व केजरीवाल यांचे कुटील राजकारण ठावूक असल्याने जनता अशा गलिच्छ राजकारणाला फारशी धूप घालत नाही व घालणार नाही. इराण-अमेरिका युद्ध सुरू झाल्यानंतर गॅस टंचाईबाबतच्या अफवा काँग्रेसने पसरवल्यामुळे गॅससाठी कशा मोठ्या रांगा लागल्या होत्या हे आपण पाहिले आहेच. एवढ्या अफवा पसरवूनही पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवलेच, त्याखेरीज आसामसारखे राज्यही मोठ्या बहुमताने स्वतःकडे राखले. विरोधकांच्या अफवा पसरवण्याचा जनतेच्या मनावर व मोदी सरकारबाबत असलेल्या दृढविश्वासावर काडीमात्र परिणाम होत नाही, हेच या निकालांनी दाखवून दिले असे म्हटले तर ते अतिरंजित किंवा अविश्वसनीय वाटणार नाही. आता पंतप्रधान मोदी यांनी इंधन वापर आणि सोने खरेदी याबाबत स्वयंनियमनाचे आवाहन केले आहे. भारतापुढे फार मोठा पेचप्रसंग उभा आहे, असा याचा अर्थ नाही. भारताकडे आगामी वर्षभरात पेट्रोल-डिझेल आणि गॅसची आयात करता येईल एवढे परकीय चलन उपलब्ध आहे. एवढ्या संकटातही भारताची अर्थव्यवस्था बळकट असल्याचेच हे द्योतक आहे. १९९० च्या दशकात परकीय चलन जवळपास संपत आल्यामुळे ज्या पद्धतीने अमेरिका, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांनी देशाला जसे वेठीला धरले होते, ते टाळण्यासाठी शक्य तेवढे परकीय चलन वाचवणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे. भारत ज्या वस्तूंची आयात करतो, त्या वस्तूंची आयात घटवणे आवश्यक आहे. खनिज तेल, सोने आणि खाद्यतेल हे भारतीय आयातीचे तीन प्रमुख घटक आहेत. याबाबतीत सरकारने आयातीवर किंवा या घटकांच्या वापरावर निर्बंध लादण्यापेक्षा भारतीयांनी स्वयंस्फूर्तीने या साऱ्याची बचत करणे, त्यावरील खर्च कमी करणे सुरू केले तर सरकारसमोरचे आव्हान तुलनेने सुकर होते. अशी स्वयंशिस्त व स्वयंनियंत्रणाची अपेक्षा करणे यात गैर काहीच नाही. भारतीय संस्कृतीमध्ये अशा स्वयंशिस्तीचा नेहमीच अंतर्भाव केलेला आहे. मात्र भारतीय संस्कृती, परंपरा याबाबत अनभिज्ञ असलेले विरोधकच अशा निर्णयांची हेटाळणी करू शकतात.

दररोज सुमारे ५० लाख बॅरलएवढे कच्चे तेल (क्रूड ऑइल) आपण आयात करतो. रोजचे ५० लाख बॅरल म्हणजे जवळपास ८० कोटी लिटर कच्चे तेल भारताला रोज आयात करावे लागते. याचा अर्थ आपल्या गरजेच्या जवळपास ९०% कच्चे तेल आपण आयात करतो आहे. कच्च्या तेलाची सध्याची किंमत अंदाजे १०४ डॉलर प्रति बॅरल आहे. याचाच अर्थ असा की, आपण रोज सुमारे ५२ कोटी डॉलर कच्चे तेल आयातीसाठी खर्च करतो. भारतीय रुपयांत ही रक्कम रोज सुमारे ४५०० कोटी एवढी म्हणजे वषार्ला १५ लाख कोटी रुपये होते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या एका बॅरलची किंमत समजा एक डॉलरने वाढली, तर आपल्याला १७ हजार कोटी रुपये जास्त मोजावे लागतात. डॉलरच्या तुलनेत रुपयाची एक रुपयाने जरी घसरण झाली, तरी १४ हजार कोटी रुपये जास्त लागतात. गेल्या वर्षी ६० डॉलरपेक्षा कमी असणारी कच्च्या तेलाची किंमत आज १०० डॉलरपेक्षा अधिक झाली आहे. त्यामुळे आपल्या परकीय चलन साठ्यावर किती मोठा परिणाम झाला आहे, हे आपल्या लक्षात येऊ शकते. सर्व सोंगे आणता येतात परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही, अशी आपल्याकडे म्हण आहे. कदाचित विरोधकांना ती म्हण माहीत नसल्याने त्यांनी या गंभीर परिस्थितीचे आकलन करून न घेता दुगाण्या झाडण्यात धन्यता मानली.

आंतरराष्ट्रीय स्थिती लक्षात घेऊनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आर्थिक शिस्त बाळगण्याचे आवाहन केले आहे. परकीय चलन वाचवण्यासाठी शक्य ते सर्व उपाय योजा, असे पंतप्रधानांनी सांगितले आहे. दररोजच्या प्रवासासाठी एकट्याने चारचाकी चालवण्याऐवजी त्याचा सामूहिक वापर करा, चारचाकीचा वापर शक्य तेथे टाळून मेट्रो वा अन्य सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा, जेथे शक्य आहे तेथे घरूनच काम करा. अशा स्वरूपाचे पंतप्रधानांचे आवाहन आहे. सोन्याची प्रचंड प्रमाणावर होणारी आयात घटली तर देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात वाचेल. त्यामुळे पुढील वर्षभर सोन्याचे दागिने विकत घेऊ नका, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. आपला देश दरवर्षी सात लाख कोटींचे सोने आयात करतो. पेट्रोल-डिझेल, सोने रुपयाच्या चलनात खरेदी करीत असलो, तरी आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि सोने यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार अमेरिकी डॉलरमध्येच करावा लागतो. परदेशी गेल्यावर भारतीय पर्यटकांचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्च होते. अनेक भारतीय पर्यटक विदेशात मोठ्या प्रमाणावर शॉपिंग करतात. देशातील सधन उच्च मध्यमवर्गामधील ही हौस आता लपून राहिलेली नाही. त्यामुळे शक्यतो तशा स्वरूपाचा परदेशी प्रवास टाळावा, असेही पंतप्रधान म्हणाले आहेत. या आवाहनाच्या अनुषंगाने राज्य शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मंत्री, अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर, ऊर्जाबचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर दिला आहे. कार पूलिंग, सार्वजनिक वाहतूक, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल वा बसने प्रवास करण्याचे सुचविले आहे. मंत्रालय, विभागीय आणि जिल्हास्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण, सेमिनार ऑनलाइन घेण्यावर भर देण्यात येणार आहे. सामान्य माणूसही पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो असा आजवरचा अनुभव आहे. यावेळीही सामान्य माणूस इंधन बचतीचे आणि सोने खरेदीवर नियंत्रण आणण्याचे आवाहन प्रत्यक्षात आणेल, यात शंका नाही.

पर्यावरण रक्षण आणि आपण



पर्यावरण संतुलन हा आजचा कळीचा मुद्दा आहे. प्लास्टिक, कागद आणि अ‍ॅल्युमिनियमचा वापर कमी करून आपण पर्यावरणाचे रक्षण करू शकतो. या वस्तूंचे उत्पादन निसर्गावर परिणाम करते. विकासकामे करताना पर्यावरणाचा ऱ्हास कमीतकमी व्हावा.

सध्या पर्यावरणसंतुलन हा कळीचा विषय झाला आहे. पर्यावरणाच्या संतुलनासाठी प्रत्येकाने काहीतरी केले पाहिजे, पण काय हे नक्की कुणी सांगत नाही. हे काम माझे नसून कसे शासनाचे आहे, अशी सामान्यांची भावना असते, तर हरितकर वसूल करून आहे त्या गोष्टी तशाच चालू ठेवण्याकडे शासनाचा कल! इकोफ्रेंडली, निसर्गमित्र असे भारदस्त शब्द वापरले की कसे कृतकृत्य झाल्यासारखे वाटते! महानगरपालिका खूप ठिकाणी उंच खांबांवर पाट्या लावतात 'नका करू वृक्ष-तोड, पृथ्वीचा होईल बिमोड.' या पाट्या तयार करण्यासाठी किती पर्यावरणाचा नाश झाला असेल!

ज्युरांग पार्क, सिंगापूर येथे एक उ द्बोधक मजकूर असलेली पाटी लावली आहे, खरोखर महाकाव्य ठरावे अशी! 'जेव्हा शेवटचा वृक्ष कापला जाईल, जेव्हा शेवटचा मासा जाळ्यात सापडेल, जेव्हा शेवटची नदी विषमय होईल, तेव्हा माणसाला कळेल की पैसा खाता येत नाही!' विकासप्रकल्प गरजेचे आहेत, यात कोणतीही शंका नाही, पण ते करताना निसर्गाचा ऱ्हास कमीतकमी कसा होईल, याचा विचार केलाच पाहिजे.

मालवण येथे विकासप्रकल्प राबवायचे होते, पर्यावरणावर खूप विपरित परिणाम होणार होता, म्हणून सबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत शासनाला कल्पना दिली असता संबंधित मंत्र्यांची वल्गना आठवत असेलच तुम्हाला. ते म्हणाले होते, 'आम्हाला विकास हवा आहे, तुमचे पर्यावरण समुद्रात बुडवा!' खरे आहे, साहेबांच्या विकासासाठी हे प्रकल्प चालू होणे महत्त्वाचे होते!

पर्यावरण रक्षणासाठी स्वतःपासून सुरुवात करताना आपण आपल्या वापरातील मुख्यत्वे तीन गोष्टींच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करू शकतो - प्लास्टिक, कागद, आणि अ‍ॅल्युमिनियम. या तिन्ही गोष्टी जीवनाच्या अविभाज्य गरजा ठरल्या आहेत. त्या तिन्ही आपण निसर्गातील घटकांपासून मिळवतो. या प्रक्रियेत निसर्गाचा काहीतरी ऱ्हास होणारच! बर, कोणत्याही एका वस्तूचा वापर कमी केल्यास त्याचा भार इतर दोन गोष्टींवर पडणार. अ‍ॅल्युमिनियमविषयी थोडा संभ्रम असू शकेल. रोजच्या वापरात अनेक पदार्थांची, औषधाची वेष्टने, फॉईल यासाठी अ‍ॅल्युमिनिअम वापरतात. या तीनही गोष्टींचा सम्यक वापर करणे, पुनर्वापर करणे, त्यावरील अवलंबित्व कमी करणे, हे तरी आपण करूच शकतो. नवे वृक्ष लावता नाही आले तरी आहे त्या वृक्षांची निगा राखू शकतो. एक उदाहरण- अमेरिकेत टिश्यू पेपरचा वापर इतका प्रचंड आहे की एक माणूस दर वर्षी तब्बल २५ किलो कागद वापरतो, त्यावरून उधळपट्टीची कल्पना यावी.

प्लास्टिक उत्पादनाचा संबंध आपल्याशी कसा आहे, हा प्रश्न पडणे स्वाभावीक आहे. या गोष्टींचे उत्पादन करताना नक्की काय होते? तेलाच्या विहिरीतून, 'रिग'मधून तेल-मिश्रित चिखलच येतो. त्याला आपण 'क्रूड' ऑइल म्हणून संबोधतो. त्यावर प्रक्रिया करून पेट्रोल, डीझेल, रॉकेल, मशिनरीत वापरले जाणारे वंगण, इत्यादी तयार केले जातात. त्यासोबत जोडउत्पादन म्हणून मिथेन वायू मिळतो. त्यात कार्बन डाय ऑक्साइडपेक्षा २५ पट उष्णता धारण करण्याची क्षमता असते आणि तोच स्वयंपाकासाठी वापरला जातो तो गोबरगॅस म्हणून. याबरोबरच या प्रक्रियेत प्लास्टिक आणि इतर रसायने मिळतात.

प्लास्टिक उत्पादनासाठी बाकी कोणताही पर्याय नाही. तेलविहिरी खणण्यासाठी पृथ्वीच्या पृष्ठभागापासून तीन ते पाच मैल खोल जावे लागते. कुशल मनुष्यबळ, अवजड यंत्रणा, वाहतुकीची साधने, त्यासाठी लागणारी ऊर्जा यांचा आपण कधी विचार तरी करतो का? बहुतेक तेल विहिरी वाळवंटात आहेत, पण वाळवंटे हे एक परिपूर्ण, जिवंत परिसंस्था आहेत; त्यांचा पर्यावरण रक्षणात महत्त्वाचा सहभाग आहे. खाणकाम करताना धातू किंवा क्रूड ऑइलच्या थरापर्यंत पोहोचण्याच्या आधी कोट्यवधी लिटरचा पाण्याचा थर असतो. त्याचा राक्षसी शक्तीचे पम्प लावून निचरा करावा लागतो.

या सर्व पर्यावरणविघातक गोष्टींचा परिणाम कमी करण्यासाठी शासन अनेक गोष्टी करू शकते. जास्तीत जास्त इंधन मिळवणे, चांगल्या क्षमतेने चालणारी वाहने तयार करण्यास प्रोत्साहन देणे, इत्यादी. आपणही प्लास्टिकचा वापर विचारपूर्वक करणे, पुनर्वापर करणे, प्लास्टिकच्या फक्त टिकाऊ गोष्टी तयार करणे, इत्यादी. महत्त्वाचं म्हणजे प्लास्टिकची योग्य तहेने विल्हेवाट लावली पाहिजे. या गोष्टींचा विचार केल्यास प्लास्टिक सुद्धा इको-फ्रेंडली ठरू शकेल!

अ‍ॅल्युमिनियम आणि कागद यांचा एकत्रित विचार करू. कागद अर्थातच वृक्षांपासून बनवतात, आणि अ‍ॅल्युमिनियम बॉक्साइट या रूपात खाणीतून मिळते. कागद निर्मितीत पाण्याचीही अतिरिक्त आवश्यकता असते. तोडलेली वृक्षसंपदा कारखान्यापर्यंत वाहून नेणे आणि कागद करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया यासाठी ऊर्जावापर होतोच. बॉक्साइट खाणींच्या उत्खननासाठी सुद्धा अवजड यंत्रणा लागते, ऊर्जा प्रचंड प्रमाणात लागते, आणि पुन्हा कारखान्यांत ते शुद्ध करण्यासाठी अतिप्रचंड प्रमाणात ऊर्जा वापरली जाते. या दोन्ही उत्पादनांमध्ये वृक्षतोड आलीच. बॉक्साइट खाणींवर असणारी जंगले अर्थातच नष्ट झाली. अनेक प्राणी, पक्षी, कीटक, आणि सूक्ष्मजीव यांचा अधिवास नष्ट झाला. नैसर्गिक आणि मोफत चालणारी वातानुकूलन यंत्रणा बंद पडली! जे वृक्ष भूगर्भजलाची पातळी राखण्यास कारणीभूत होते त्यांच्यावर गदा आली. वृक्ष आणखी एक अतिमहत्त्वाचे काम करतात. एक मोठा वृक्ष आपल्या उच्छ्वासाद्वारे प्रतिदिन १५० ते २०० लिटर पाणी वातावरणात सोडून हवेतल्या नद्या म्हणजे 'एरियल रिव्हर्स' तयार करतात! याच 'नद्या' घनता वाढल्यावर पर्जन्य तयार करतात. हेच वृक्ष प्राणवायूचेही कारखाने आहेत. याबरोबरच आपल्याला फुले-फळे यांचा अनिर्बंध पुरवठा करतात! खाणी या 'ओपन' स्वरूपात असतात. त्यामुळे कडेची जमीन तापते आणि त्यातले बाष्प कमी होते. वादळ-वाऱ्यांपासून नैसर्गिक तटबंदी करणारी जंगले नष्ट झाल्यावर वादळे दूरपर्यंत घुसून उरलेल्या निसर्गसंपदेला मारक ठरतात. हा पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आपण फक्त एकच करू शकतो - वापर गरजेपुरता आणि मर्यादित करणे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतियांना इंधन आणि तेल यांचा वापर न्यून करण्याचे अन् भारतीय चलन आपल्याच देशात रहावे, यासाठी 'विदेशातील सहलींपेक्षा देशांतर्गत सहली काढा', असे आवाहन केले. 'जनतेला काटकसरीचा सल्ला देऊन पंतप्रधान मात्र ५ दिवसांच्या विदेश दौऱ्यावर गेले', अशी हास्यास्पद टीका काहींनी केली. श्रीमंत जनता सहलीसाठी विदेशात जाते; पंतप्रधान राष्ट्राची बाजू मांडण्यासाठी आणि राष्ट्राला तारून नेण्यासाठी त्या देशांचा लाभ करून घेण्यासाठी विदेशात जातात, हे ठाऊक असूनही दोघांच्या विदेश दौऱ्यांची तुलना करणे, याला कुठले राजकारण म्हणावे? देश संकटात असतांना अशा प्रकारे राष्ट्रप्रमुखावर हास्यास्पद टीका अन्य कुठल्या देशांत होत नसावी. गेल्या १० वर्षांत विदेश दौरे करून पंतप्रधानांनी भारतासाठी काय साध्य करून घेतले आहे, याची सूची काढायला गेले, तर १ मोठा ग्रंथ निर्माण होईल. ज्या अमेरिकेने मोदी यांना त्यांच्या देशात येण्यास बंदी घातली होती, त्याच भूमीवर 'मोदी' नावाचा किती जयघोष झाला, हे ट्रम्प यांच्या पहिल्या निवडणुकीच्या पूर्वी सर्वांनी पाहिले. असो. पंतप्रधानांनी जगातील विविध देशांशी द्विपक्षीय संबंध जोडल्याच्या अनेक फलनिष्पत्तींपैकी एक मोठी फलनिष्पत्ती म्हणजे सध्याच्या युद्धकाळातही इराणसारख्या इस्लामी राष्ट्राकडून तेल मिळणे चालूच राहिले, ही होती, हे साऱ्या देशाने पाहिले. भारतासारखा एवढी वर्षे आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्त राहिलेला किंवा महासत्तेखाली दबून राहिलेला देश आता मात्र जगातील एकमेकांचे शत्रू असलेल्या देशांशी स्वतःचे मात्र वैयक्तिक चांगले संबंध जोपासतो. एवढेच नव्हे, तर भारताच्या दृष्टीने त्यांच्यापैकी एखादा देश जरी अयोग्य बोलला, तरी त्याने कितीही साहाय्य केलेले असले, तरी त्या त्या सूत्रावर त्याला सुनावण्यास तो आता मागे-पुढे पहात नाही, एवढी आपली क्षमता सध्या निर्माण झाली आहे. आखाती देश आणि युरोप या दोन्ही खंडांमध्ये भारताचे वजन आता महासत्तांच्या दबावाखाली न येता, एक स्वतंत्र स्वाभिमानी अस्तित्व म्हणून उदयास आले आहे. त्यामुळेच इराणसारख्या देशाला आता भारतावर विश्वास टाकायला अडचण वाटत नाही. हे भारताच्या परराष्ट्र नीतीचे यश आहे. विदेश दौऱ्यांविना हे साध्य झाले असते का?

भारताची ऊर्जा स्थिती आणि परराष्ट्र नीती!

एका इंग्रजी वृत्तपत्राच्या वृत्तानुसार सध्याच्या घडीला भारतात केवळ १८ दिवस पुरेल एवढेच इंधन आहे. पुढील इंधन, ऊर्जा आदींची सोय करण्यासाठी पंतप्रधान विदेश दौऱ्यावर गेले असतील, तर तो दौरा किती अत्यावश्यक आणि महत्त्वाचा आहे, हे लक्षात घेण्यासाठी पुष्कळ काही बुद्धी चालवण्याची आवश्यकता नाही. तज्ज्ञांच्या मते पंतप्रधान मोदी यांचा सध्याचा ५ देशांचा दौरा हा भारतीय ऊर्जासुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. विश्वभरात विविध ठिकाणी चाललेल्या युद्धांमुळे जागतिक स्तरावर निर्माण झालेली अस्थिरता भारतावर आर्थिक परिणाम करत आहे. एकीकडे गेल्या ३ आठवड्यांत भारतातील तेलसाठा अल्प होत आहे आणि दुसरीकडे भारतात आयात होणाऱ्या तेलसाठ्याचे प्रमाण न्यून होत आहे. या पार्श्वभूमीवर भारताला जो कुणी म्हणून ऊर्जापुरवठा करील, त्या देशाची भारताला आवश्यकता आहे. पूर्वी आपण २६ देशांकडून इंधन घेत होतो, ती संख्या आपण आता ४१ केली आहे. आखाती देश आणि रशिया यांच्याप्रमाणे युरोपातील देशांचीही ऊर्जेसाठी आपल्याला आवश्यकता आहे. आज भारताला ८५ टक्के इंधन आयात करावे लागते. या दौऱ्यातून भारताला हायड्रोजन इंधन, अर्धसंवाहक उत्पादन आणि सागरी अर्थव्यवस्थेसाठी प्रगत युरोपीय तंत्रज्ञान मिळण्याची शक्यता आहे. संयुक्त अरब अमिराती 'ओपेक'मधून ('तेल असणाऱ्या आखाती देशांच्या गटा'मधून) बाहेर पडल्याने त्याचा लाभ घेत भारत त्याच्याशी ऊर्जासंबंध वाढवत आहे. संयुक्त अरब अमिरातीशी ('यूएई'शी) झालेले पेट्रोलियम करार आणि रशियाकडून तेल मागवण्याच्या संदर्भातील करार यांमुळे भारत इंधनासाठी आता 'ओपेक'वर पूर्ण अवलंबून रहाणार नाही. त्यामुळे एक प्रकारे भारताचे आखाती देशांतील वर्चस्वही भक्कम झाले आहे. दुसऱ्या बाजूला युरोपातील देशांमधूनही इंधन व्यापार करण्यास भारताने स्वतःला मोकळे ठेवले आहे. सध्या पाकिस्तान, तुर्कीये, कतार आणि सौदी अरब हे देश एकत्र येत असतांना त्यांना तोंड देण्यासाठीही संयुक्त अरब अमिरातीशी मैत्री उपयोगी ठरणार आहे. नेदरलँडशी १७ करार झाले आहेत, त्यात ऊर्जा करारही आहे. चोल साम्राज्यकालीन पुरावे भारतात आणणे यांसारख्या गोष्टीही या दौऱ्यात आहेतच!

अमेरिकेशी तोंड देण्याची सिद्धता

मध्यंतरी अमेरिकेची गुप्तचर संघटना 'सीएए'च्या प्रतिनिधीला भारतात अटक करण्यात आली. बंगालच्या माध्यमातून भारतापासून पूर्वांचल तोडण्याच्या प्रयत्नांना अमेरिकेची सुप्त फूस होती, असेही आता पुढे येत आहे. या सर्वांमागे महासत्ता म्हणून विकसित होऊ पहाणाऱ्या भारताला लगाम घालणे हाच हेतू आहे. बंगालमधील भाजपच्या विजयानंतर अमेरिकेचे मनसुबे ध्वस्त झाल्यानेच आता एवढे दिवस छत्तीसचा आकडा असणाऱ्या चीनशी अमेरिकेने 'शत्रूचा शत्रू तो मित्र' या नात्याने हातमिळवणी चालू केली आहे. हा सर्व संदर्भ देण्याचे कारण म्हणजे अमेरिकेसारख्या भारताला आतून पोखरू पहाणाऱ्या, कर लादणाऱ्या, रशियातून येर्णाया इंधनावर नियंत्रण ठेवू पहाणाऱ्या, मनात येईल तेव्हा पाक आणि चीन यांच्याशी मैत्री करणाऱ्या अमेरिकेच्या बेताल धोरणांचा भारतावर परिणाम होऊन नये; म्हणून आखाती देशांसह आशिया, रशिया आणि युरोपमधील देश यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले जात आहेत. त्यासाठी हा दौरा महत्त्वाचा आहे. महामारी, युद्ध आणि ऊर्जासंकट या मागोमाग आलेल्या जागतिक संकटांमध्ये तरून जाण्यासाठी भारत एकीकडे स्वयंपूर्ण अन् आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न करत आहे अन् दुसरीकडे पैसा देशात रहाण्यासाठी विविध आवाहने जनतेला करत आहे. चीनकडे एखादी गोष्ट निर्यात होते, तेव्हा ती गोष्ट त्यांच्याच देशात कशी बनेल (रिव्हर्स इकॉनॉमी), याला ते प्रथम प्राधान्य देतात. त्यामुळे तिथे 'टेस्ला'सारख्या गाड्यांची विक्री न्यून झाली आहे. हेच दुसऱ्या भाषेत सांगायचे, तर 'राष्ट्र प्रथम' आहे. पंतप्रधान भारतातील जनतेला आगामी काळाचा धोका ओळखून आवाहने करत आहेत; परंतु भारतातील विरोधी पक्ष त्यांच्यावर तोंडसुख घेऊन सामान्य जनतेची दिशाभूल करत आहेत. भारत स्वावलंबी ऊर्जा धोरण आखत आहे. त्यासाठी सौरऊर्जा, विजेवर चालणारी वाहने, हरित हायड्रोजन, जैवइंधन अशा गोष्टींवर तो भर देत आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जा समीकरणाची गणिते पालटू शकतात. तात्पर्य पंतप्रधानांच्या दौऱ्याची तुलना सहलीशी करणाऱ्यांनी निदान देशावरील सध्याची संकटे समजून घेतली, तरी देशभक्ती दाखवल्यासारखे होईल!

तवा राईस

सामग्री : २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

कृती : सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



- पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.
- केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.
- सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.
- केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.
- केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.
- स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.
- पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.



वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

पचनक्रिया व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर



फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त

फुफ्फुसाचा कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

चार्ज करताना लक्ष ठेवा

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.



पाण्यापासून दूर ठेवा

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय...



फेसवॉश : चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

कोमट पाणी : फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

घासू नका : चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

मेकअप काढा : मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे

अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.



ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.

ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.



शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.

पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.

पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

पुदिन्याची पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात ॲंटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

चंदन, वाळा सरबत

घटक : चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

कृती : पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.

उपयोग

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.



आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

कुटुंबातील एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो. डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



आजाराचा धोका

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

लक्षणे

- ▮डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे
- ▮एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे
- ▮दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे
- ▮डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

निदान कसे करावे

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्साकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची ॲंजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात. या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

कुठे चाकू हल्ला तर कुठे हाणामारी, तर कुठे 12 तास रांगेत...

पेट्रोल-डिझेलची राज्यात काय स्थिती?



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

देशात एकाच आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत प्रति लिटर जवळपास 4 रुपयांची वाढ झाली आहे. तर राज्यातील अनेक भागात इंधनाचा सुरळीत पुरवठा होत नसल्याने पंपबाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलचा टँकर आल्यावर वाहनधारकांची गर्दी तुटून पडत आहेत. पंपावर गोंधळाची स्थिती आहे. काही ठिकाणी वाहनधारकांमध्ये हाणामारी सुरू आहे. तर काही ठिकाणी बाचाबाचीच्या घटना घडल्या आहेत. पावसाळा तोंडावर आला आहे. शेतीच्या कामांना वेग आला आहे. पण ट्रॅक्टर आणि शेतीच्या पंपासाठी डिझेल मिळत नसल्याने शेतकरी संतापला आहे. अनेक ठिकाणी नागरिकांनी इंधन मिळत नसल्याने रस्त्यावरच ठिय्या मांडत आंदोलन केले आहे. तर काल जळगाव जिल्ह्यातील एका पेट्रोल पंपावर कर्मचाऱ्याच्या पोटात चाकू खुपसण्यात आला. त्यामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचारी या प्रकारामुळे धास्तावले आहेत. पेट्रोल पंपावर पोलिसांचा बंदोबस्त लावण्याची मागणी करण्यात येत आहे.

पेट्रोल पंप कर्मचाऱ्यावर चाकूने प्राणघातक हल्ला

जळगाव जिल्ह्यातील म्हसावद येथील पंपावर पेट्रोल डिझेल साठा शिल्लक नसल्याने तसेच पेट्रोल देण्यास नकार दिल्याचे रागातून कर्मचार्यांच्या पोटात चाकू खुपसला. तुषार गुरव असे २१ वर्षीय जखमी पेट्रोल पंप कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी हल्ला करणाऱ्या दोन अनोळखी तरुणाविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. चाकू हल्ल्याची ही घटना पेट्रोल पंपावरील सीसीटीव्हीत कैद झाली आहे. चाकू हल्ल्यात पेट्रोल पंप कर्मचारी पोटात तीन ते चार इंचापर्यंत तरुणाला जखम झाली आहे. पोलिसांनी घटनेला दुजोरा दिला असून हल्ला करणाऱ्या अनोळखी व्यक्तींचा शोध घेतला जात असल्याची माहिती दिली आहे.

जळगावच्या पारोळ्यात डिझेल मिळत नसल्याने नागरिकांचा राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

जळगाव जिल्ह्यातील पारोळा महामार्गावरील पेट्रोल पंपा समोर कॅन तसेच दुचाकी आडव्या लावून नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केलं. पंधरा ते वीस मिनिटांपर्यंत नागरिकांनी रोज व्यक्त करत वाहने अडवून धरल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहनांच्या लांब रांगा लागल्याने महामार्गावरील एका बाजूची वाहतूक काही काळासाठी ठप्प झाल्याचे पाहायला मिळालं. शेतीच्या कामांसाठी डिझेल मिळवण्यासाठी शेतकरी पंपांवर मोठी गर्दी करत असल्याचा पाहायला मिळत आहे. सर्वत्र शोधाशोध करूनही डिझेल मिळत नसल्याने शेतकरी तसेच नागरिक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे..

डिझेलसाठी 12 तासांपेक्षा अधिकचे वेटिंग

मागील हस्यापासून जिल्ह्यात इंधन टंचाई भासत आहे.. ज्या पंपावर इंधन उपलब्ध आहे, त्याठिकाणी वाहनाच्या रांगा आहे. बुलढाणा ते चिखली मार्गावरील पंपावर रात्री पासून वाहनाच्या रांगा लागल्या आहे . तब्बल 12 तासांपेक्षा जास्त वेळापासून ट्रॅक्टर आणि इतर वाहने रांगेत उभी आहेत . मात्र पंप मालक नंबर आल्यावर फक्त 1 हजार रुपयांचे डिझेल देत आहे. वास्तविक पाहता ट्रॅक्टर ल एक हजार डिझेल जाणे येणेसाठीच लागते. तर इतर ओळखीच्या लोकांना मात्र वाहनाची टाकी फुल करून देत आहे. आम्हाला सुद्धा शेती कामे सुरु असल्याने ट्रॅक्टर मध्ये टाकी फुल करून डिझेल द्यावे अशी मागणी ट्रॅक्टर मालकांनी केली.

डबल इंजिन सरकारच्या इंजिन मधील तेल पण संपले का?

तर या सर्व परिस्थितीवर राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी टीका केली आहे. जळगाव मध्ये पेट्रोल नाही म्हणून काही अज्ञातांनी पंपावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याच्या पोटात चाकू खुपसला. बुलढाण्यात पेट्रोल मिळण्याच्या आशेवर लोक १२ तास लाइनमध्ये उभे राहिले, अकोलाच्या वाशिम नाका येथे पेट्रोल डिझेल मिळावे म्हणून हाणामारी. नागपूर मध्ये बेपत्ता मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडे डिझेल नाहीच्च चालय तरी काय? डबल इंजिन सरकारच्या इंजिन मधील तेल पण संपले का? असा टोला त्यांनी लगावला आहे.

वाशिममध्ये पेट्रोलपंपावर हाणामारी

वाशिम शहरातील आकोला नाका परिसरातील इंडियन पेट्रोल पंपावर डिझेलसाठी लागलेल्या गदीर्तून हाणामारीचा प्रकार समोर आला आहे. दुपारी चार वाजता डिझेल टँकर दाखल होताच मोठ्या प्रमाणात वाहन चालक आणि नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी नंबर लावण्याच्या कारणावरून काही जणांमध्ये वाद झाला आणि एकमेकांना डिझेलच्या कॅनने मारहाण करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे काही काळ पेट्रोल पंप परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून जिल्ह्यातील डिझेल टंचाईमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे.

वांद्रेतील गरीब नगरमध्ये तणाव
पोलिसांवर बाटल्या फेकल्यानंतर लाठीचार्ज, कारवाई मात्र सुरूच राहणार



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील वांद्रे पूर्व परिसरातील 'गरीब नगर' भागात सलग दुसऱ्या दिवशी तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामांवर हातोडा चालवण्याची मोहीम सुरू असून, या दरम्यान एका मशिदीचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. या कारवाईमुळे परिसरातील रहिवाशांच्या भावना तीव्रपणे दुखावल्या गेल्या. प्रशासनाच्या या धडक कारवाईचा निषेध नोंदवण्यासाठी संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने सुरू केली, ज्यामुळे परिसरात काही काळ भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

आंदोलनाला हिंसक वळण

नागरिकांच्या या रोषाने लवकरच हिंसक वळण घेतले. बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या मुंबई पोलिसांवर आंदोलकांनी पाणी आणि पाण्याच्या बादल्या फेकल्याचा धक्कादायक प्रकार घडला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच, जमावाला पांगवण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना अखेर लाठीचार्जचा अवलंब करावा लागला. समोर आलेल्या दृश्यांमध्ये पोलीस आणि स्थानिक नागरिक यांच्यात मोठी झटापट होताना स्पष्ट दिसत होते. तसेच, काही महिला पोलीस कर्मचारी आंदोलकांना ओढून नेत असल्याची विदारक दृश्येही पाहायला मिळाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या हिरव्या कंदीलानंतर मंगळवारपासून सुरू झालेल्या या मोहिमेच्या पहिल्याच दिवशी, ५०० बेकायदा झोपड्यांपैकी सुमारे १८ टक्के बांधकामे हटवण्यात प्रशासनाला यश आले आहे.

लाचखोरी प्रकरणी मोठी कारवाई, येवल्यात एकाच वेळी 8 वन कर्मचाऱ्यांना पकडले

■नाशिक। प्रतिनिधी,

शासकीय कार्यालयांमध्ये वाढत चाललेल्या लाचखोरीचा आणखी एक धक्कादायक प्रकार नाशिक जिल्ह्यात उघडकीस आला आहे. येवला येथे नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत वनपरिक्षेत्र विभागातील तब्बल आठ कर्मचाऱ्यांना रंगेहात ताब्यात घेतले. एकाच कार्यालयातील एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचारी लाच घेताना पकडले गेल्याने संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून ही कारवाई जिल्ह्यातील सर्वात मोठ्या एसीबी ऑपरेशनपैकी एक मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला वनपरिक्षेत्राच्या हद्दीत असलेल्या काही झाडांची तोड करण्यासाठी अधिकृत परवानगी आवश्यक होती. संबंधित प्रक्रिया नियमानुसार पूर्ण होऊ शकत असतानाही, वनविभागातील काही कर्मचाऱ्यांनी परवानगी मंजूर करण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी केल्याचा आरोप आहे. वारंवार लाचेची मागणी होत



असल्याने त्रस्त झालेल्या तक्रारदाराने थेट नाशिक एसीबी कार्यालयाशी संपर्क साधत अधिकृत तक्रार नोंदवली.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी प्राथमिक पडताळणी केली. तक्रारीत तथ्य आढळल्यानंतर पथकाने अत्यंत गोपनीय पद्धतीने येवला वनपरिक्षेत्र कार्यालयात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारली जात असतानाच एसीबीच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकत एकामागून एक अशा आठ कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे कार्यालयात एकच गोंधळ उडाला, तर येवला परिसरातही या घटनेची जोरदार चर्चा सुरू झाली.

या धाडसी कारवाईमुळे वनविभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एसीबीकडून ताब्यात घेतलेल्या सर्व संशयितांची कसून चौकशी सुरू असून या प्रकरणात आणखी काही अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी आहेत का, याचाही तपास केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणात काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, या कारवाईनंतर संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून एकाच वेळी आठ शासकीय कर्मचारी लाचखोरीच्या आरोपात अडकणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. रात्री उशिरापर्यंत संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. एसीबीच्या या मोठ्या कारवाईमुळे जिल्ह्यातील इतर शासकीय विभागांमध्येही मोठी चर्चा रंगली आहे.

'माझ्याशी बोलणं का बंद केलं?' अनैतिक संबंधातून दीराने केली वहिनीची हत्या

■कल्याण। प्रतिनिधी,

वहिनी ही आईसमान असते असं म्हटलं जातं. मात्र, कल्याणमध्ये नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अनैतिक संबंधातून एका महिलेची तिच्याच दिराने डोके भिंतीवर आपटून हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. काही दिवसांपासून बोलणं बंद केल्याच्या रागातून आरोपीने हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. खडकपाडा पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला थेट झारखंडमधून अटक केली असून, अवघ्या 20 मिनिटांचा उशीर झाला असता तर आरोपी नेपाळमध्ये फरार झाला असता.

वहिनीने बोलणं बंद केल्याने दीराकडून वहिनीची हत्या

कल्याण पश्चिम परिसरात राहणाऱ्या गुड्डू देवी या महिलेला 27 एप्रिल रोजी गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचार सुरू असताना



11 मे रोजी त्यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा प्रकार अपघात असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. मात्र, खडकपाडा पोलिसांच्या तपासात धक्कादायक सत्य समोर आलं. मृत महिला आणि तिचा दीर बम बम कुमार यांच्यात प्रेमसंबंध असल्याचं तपासात उघड झालं. काही दिवसांपासून महिलेने आरोपीशी बोलणं बंद केलं होतं. याच कारणावरून आरोपी तिच्या घरी पोहोचला आणि दोघांमध्ये वाद झाला. रागाच्या भरात आरोपीने महिलेचे डोके भिंतीवर आपटल्याने ती गंभीर जखमी झाली.

आरोपी नेपाळला पळण्याच्या तयारीत असताना अटक

घटनेनंतर आरोपीचा मोबाईल बंद असल्याने पोलिसांसमोर तपासाचं मोठं आव्हान उभं राहिलं होतं. अखेर नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीच्या झारखंडमधील मूळ गावाचा शोध घेतला. डीसीपी अतुल झेंडे, एसीपी अशोक होनमाने आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक झारखंडमध्ये रवाना करण्यात आलं.

दरम्यान, आरोपीला पोलीस मागावर असल्याची माहिती मिळाल्याने तो नेपाळमध्ये पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, स्थानिक पोलिसांच्या मदतीने कल्याण पोलिसांनी त्याला नाट्यमयरीत्या ताब्यात घेतलं. आरोपीला कल्याणमध्ये आणून न्यायालयात हजर करण्यात आलं असून न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी भूषण देवरे करत आहेत.

५ वर्षांच्या दिव्यांग मुलाची निर्घृण हत्या... आई-वडील फरार

■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगर येथे माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. अवघ्या पाच वर्षांच्या दिव्यांग मुलाची निर्घृण हत्या करण्यात आली असून या प्रकरणात स्वतः मुलाचे आई-वडील संशयित असल्याची माहिती समोर येत आहे. घटनेनंतर दोघेही फरार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलाचे आई-वडील रोजगाराच्या शोधात सुमारे आठ दिवसांपूर्वी शहरात आले होते. मात्र आर्थिक अडचणी आणि मुलाच्या अपंगत्वामुळे ते दोघेही मानसिक तणावाखाली होते. या परिस्थितीला कंटाळून त्यांनीच मुलाची निर्दयी हत्या केल्याचा प्राथमिक माहिती आहे.

शेतात आढळला मुलाचा मृतदेह

ही धक्कादायक घटना हरसूल सावंगी बायपास परिसरात उघडकीस आली. स्थानिकांना एका शेतात मुलाचा मृतदेह आढळून आल्यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

गळा आवळून हत्या केल्याचा संशय

प्राथमिक तपासात मुलाचा गळा आवळून त्याची हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शवविच्छेदन अहवालात मुलाच्या तोंडावर आणि डोक्यावर मारहाण झाल्याचेही स्पष्ट झाले असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, मृत्यूपूर्वी मुलाच्या हातात खाऊच पाकीट असल्याचेही समोर आले आहे.

आरोपी आई-वडिलांचा शोध सुरू

घटनेनंतर आरोपी आई-वडील फरार झाले असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तयार केली आहेत. शहरातील सीसीटीव्ही फुटेज, स्थानिक माहितीदारांची मदत घेण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दिव्यांग मुलांवरील अत्याचाराचा मुद्दा पुन्हा एकदा असून समोर आला आहे, अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



पुण्यात झोपेतून उठलेल्या मुलाच्या चेहऱ्यावर ॲसिड हल्ला

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यातील कोथरूड परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पैशाच्या वादातून संतप्त झालेल्या वडिलांनी स्वतःच्या मुलावर ॲसिड फेकल्याची घटना कोथरूडमधील केळेवाडी परिसरात घडली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तुषार कदम (वय 30) असं या हल्ल्यात जखमी झालेल्या मुलाचं नाव आहे. दरम्यान, हल्ला केल्यानंतर त्याचे वडील शाम कदम फरार झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, 14 मे रोजी तुषार शाम कदम (वय 30) हे आपल्या घरात झोपलेले असताना पैशांच्या कारणावरून त्यांचा वडिलांसोबत वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला



की संतापाच्या भरात वडिलांनी घरातील स्वच्छतागृह साफ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ॲसिडची बाटली मुलाच्या चेहऱ्यावर फेकली.

या हल्ल्यात तुषार कदम यांच्या डोळ्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तुषार कदम यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपी वडिलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल होताच आरोपी वडील फरार झाले असून, त्यांचा शोध घेण्यासाठी कोथरूड पोलिसांनी विशेष पथके तयार केली आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमागे नेमका आर्थिक वाद काय होता, तसेच कुटुंबामध्ये यापूर्वीही वाद झाले होते का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे. घरगुती वादातून थेट ॲसिड हल्ल्यासारखी गंभीर घटना घडल्याने परिसरात मोठी चर्चा सुरू असून, कोथरूड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

धावत्या कारमध्ये महिला वकिलावर लैंगिक अत्याचार, भयंकर प्रकरण



■पुणे। प्रतिनिधी,

पुणे शहरात एका महिला वकिलाचे धावत्या कारमध्ये लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. आरोप असा की, रविवारी रात्री कारमध्ये महिलेसोबत अश्लील कृत्य करण्यात आले होते. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून एका आरोपीचा तपास सूरू करण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस पुढील प्रकरणाचा तपास करत आहे.

कारमधील आरोपीने तरूणीशी केले अश्लील कृत्य

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व लोक एका कारमधून बंड गार्डन परिसरात पबजवळ आले होते. याचदरम्यान, कारमध्ये बसलेल्या आरोपीने महिलेशी अश्लील कृत्य केलं. आरोपी असा की, प्रवासादरम्यान आरोपींनी दोन मित्रांना फोन लावून महिलेशी अश्लील वक्तव्य केले. कारमध्ये बसलेल्या इतरांनी देखील अश्लील वक्तव्य केली होती. या कृत्याने पीडित महिलेनं आरोपींना आणि त्याच्या मित्रांना माफी मागण्यास भाग पाडले. जेव्हा कार थांबली तेव्हा महिला आणि चार आरोपींमध्ये भरस्त्यातच वाद झाला होता. या प्रकरणात असा आरोप करण्यात आला की, आरोपींनी महिलेची पर्स बॅग रस्त्यावर फेकून दिली आणि तिथून ते पळून गेले.

यानंतर पीडितेनं स्थानीक लोकांना मदतीची मागणी केली, इतक्यात तिने आपल्या एका मित्राशी संपर्क साधला होता. नंतर तिने कोरेगाव पोलीस ठाणे गाठलं आणि या प्रकरणाचा तपास केला. पोलिसांनी कारवाईच्या आधारे कारवाई केली. या प्रकरणात तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. ज्यात अभिषेक नवनाथ मुक्टे, धनंजय सॉर्टे आणि आदेश शिंदे अशी आरोपींची ओळख समोर आली. या प्रकरणी एफआरआय दाखल करण्यात आली आहे. अशातच चौथ्या आरोपीचा पोलीस तपास करत आहेत.

पी.एच.डी. स्कॉलर तरुणीवर मैत्रिणीच्या भावाकडून बलात्कार, नशायुक्त पदार्थ, व्हिडीओ अन् आत्महत्या

■पुणे। प्रतिनिधी,

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर परिसरातून एक अत्यंत दुदैर्वी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका 25 वर्षीय पी.एच.डी. स्कॉलर तरुणीने एका नराधमाच्या छळाला आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केली आहे. मृत तरुणीने आत्महत्या करण्यापूर्वी आरोपीने तिच्यावर बलात्कार केल्याचा आणि अश्लील व्हिडिओ बनवून समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप केला होता. या खळबळजनक प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम राबवून मुख्य आरोपीला अटक केली आहे. योगेश रावत (वय 25 वर्षे) असे अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे. पीडित तरुणी मूळची मध्य प्रदेशातील दतिया येथील रहिवासी असून ती आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी ग्वाल्हेर येथे राहत होती, जिथे तिच्यासोबत हा अमानुष प्रकार घडला.

व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत दुसऱ्यांदा अत्याचार

या पहिल्या घटनेनंतर आरोपी योगेश रावत याने तरुणीला तिच्या त्या अश्लील व्हिडिओच्या जोरावर ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. हे व्हिडिओ सोशल मीडियावर म्हणजेच फेसबुक, इंस्टाग्राम किंवा इतर प्लॅटफॉर्मवर व्हायरल करून तिची बदनामी करण्याची थेट धमकी त्याने दिली. या भीतीपोटी आणि दबावामुळे त्याने तरुणीला पुन्हा एकदा हॉटेलमध्ये येण्यास भाग पाडले आणि तिथे तिच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्यांदा तिच्यावर बलात्कार केला. पोलिसांच्या माहितीनुसार, हे दोन्ही अंगावर काटा आणणारे प्रकार अनुक्रमे 13 मार्च आणि 15 मार्च रोजी घडले होते. या सततच्या छळामुळे आणि मानसिक त्रासामुळे अत्यंत हताश आणि अस्वस्थ झालेल्या तरुणीने शेवटी या अन्यायाविरुद्ध कायदेशीर लढा देण्याचे ठरवले आणि ती पोलिसांकडे पोहोचली.

पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, ग्वाल्हेरमध्ये राहून पीएच.डी.चे संशोधन करत असताना या तरुणीची ओळख तिच्या एका मैत्रिणीचा सख्खा भाऊ असलेल्या योगेश रावत याच्याशी झाली आणि त्यांच्यात मैत्री वाढली. तपासादरम्यान अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी योगेश रावत याने पीडित तरुणीला ग्वाल्हेरमधील एका हॉटेलमध्ये बोलावून घेतले होते. तिथे त्याने तिला शीतपेयातून किंवा अन्य माध्यमातून एखादा अंमली वा नशा आणणारा पदार्थ जबरदस्तीने पाजला. हा नशायुक्त पदार्थ शरीरात गेल्यानंतर तरुणी पूर्णपणे बेशुद्ध झाली. ती शुद्धीत नसण्याचा गैरफायदा घेऊन नराधम योगेश रावत याने तिच्यावर अमानुषपणे बलात्कार केला. एवढ्यावरच हा नराधम थांबला नाही, तर या लैंगिक अत्याचारादरम्यान त्याने आपल्या मोबाईलवर त्या पीडित तरुणीचे अत्यंत आक्षेपार्ह आणि अश्लील व्हिडिओ देखील रेकॉर्ड केले, ज्याचा वापर त्याने पुढील गुन्ह्यासाठी केला.

एफआयआर दाखल केल्यानंतर दतिया येथे केली आत्महत्या

पीडित तरुणीने 15 मार्च रोजी ग्वाल्हेरमधील पडाव पोलीस ठाणे गाठून आरोपी योगेश रावत विरुद्ध रीतसर गुन्हा दाखल केला. पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर ती मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी दतिया येथील आपल्या मूळ गावी परतली. मात्र, या विदारक घटनेच्या मनस्तापातून बाहेर पडणे तिला असह्य झाल्याने तिने आपल्या दतिया येथील घरी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्येपूर्वी तिने एक सुसाईड नोट लिहून ठेवली होती, ज्यामध्ये तिने मुख्य आरोपी योगेश रावत आणि त्याच्या दोन बहिणींवर तिला तीव्र मानसिक त्रास दिल्याचा स्पष्ट आरोप केला असून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर सब-इन्स्पेक्टर संतोष भदोरिया यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी वेगाने चक्रे फिरवली आणि आरोपी योगेश रावत याला अशोक नगर परिसरातून अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



नेमकं त्या रात्री काय घडलं?

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित तरुणी मूळची बिहारच्या पाटणा येथील रहिवासी आहे. पुण्यात ती वकिलीचं शिक्षण घेण्यासाठी आली होती, ती सध्या मुंबईतील हायकोर्टमध्ये वकिलीचं काम करते. रविवारी रात्री ती तरुणी कोरेगाव पार्क येथील एका फाइव्ह स्टारमध्ये होती, तिथे तिने मॅट्रोमोनियल या वेबसाईवरून एका व्यक्तीला भेटण्यासाठी बोलावले होते. वृत्तमाध्यमानुसार, हॉटेलमध्ये एक व्यक्ती दोन महिलांसोबत पोहोचला होता. हॉटेलमध्ये त्यांच्यात एकमेकांशी बोलणं, भेटीगाठी झाल्या. संबंधित तरुणी ही हॉटेलमध्ये दारू पित होती, तिची ओळख शेजारील टेबलवर बसलेल्या एका तरूणाशी झाली. बोलत असताना त्यांनी दुसऱ्या पबमध्ये जाण्याचा प्लान आखला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com